# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur@dtemaharashtra.gov.in
फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in


क्रमांक:- तंशिस/विकाना/शैवि-२/पदविका/FC/२०१८/ 1995
दिनांक:- 28 MAY 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र /एचएमसीटी
पदविका संस्था, नागपूर विभाग
नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवीका प्रवेश प्रक्रियांसाठी **नवीन सुविधा केंद्र (Facilitation Centre)** करीता अर्ज सादर करण्याबाबत

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/FC/२०१८/५०७, दि. २५/०५/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, ज्या संस्थेत अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/ एचएमसीटी/ पदवीका अभ्यासक्रम सुरू आहेत व ज्या महाविद्यालयाकडे शै. वर्ष २०१७-१८ मध्ये सुविधा केंद्र नव्हते, त्या संस्थांनी संदर्भिय पत्रामध्ये नमुद सुविधा उपलब्ध आहे अश्याच पदविका संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी प्रवेश प्रक्रियेकरीता सुविधा केंद्र (Facilitation Centre) मिळण्याकरीता अर्ज **दि. ३०/०५/२०१८ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावा**. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबतची नोंद घ्यावी.

सहपत्र: संदर्भिय पत्र

**गुलाबराव ठाकरे**
**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**नागपूर**

C:\kadam\पदविका\DTE Desk १० Letter.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Website: www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादित

जा.क्र. १०/एडीएम/FC/२०१८/ ५०७

दि. 25 MAY 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सुविधा केंद्रांच्या नियुक्ती करण्याबाबत कार्यपध्दती.......

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहेत. शासनाने दिनांक १७.८.२०१५ रोजी जाहीर केलेल्या महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, दिनांक १७.०८.२०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश नियमावली आगामी काळात शासनाकडून प्रसिध्द होईल. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सहभागी होऊ इच्छिणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करणे, अभ्यासक्रमानुसार प्रवेश अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करणे,कागदपत्रे व मागणीनुसार उमेदवारांचे छायाचित्र व स्वाक्षरी यांचे स्कॅनिंग करून अपलोड करणे, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना पोचपावती देणे, जात प्रवर्ग रूपांतरीत करण्यासाठी फी आकारणे इत्यादी कामे सुविधा केंद्रांमार्फत करावी लागतात.

नजिकच्या कालावधीत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहेत. तत्पूर्वी राज्यातील अभ्यासक्रमनिहाय प्रवेश सुविधा केंद्र निश्चित करुन त्यांना प्रवेश सुविधा केंद्र म्हणून मान्यता दिल्याचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. आपल्या कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदविका **अभ्यासक्रमांच्या ज्या संस्थां यापूर्वी ( शै. वर्ष २०१७-१८ मध्ये ) सुविधा केंद्र म्हणून कार्यरत होत्या व त्यांचे सुविधा केंद्रांबाबत विद्यार्थ्यांकडून किंवा प्रशासकीय दृष्टया तक्रारी नसतील तर अशा संस्थांना आपल्या शिफारसीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्येही सुविधा केंद्र म्हणून मंजूरी देण्यात येईल.** तसेच ज्या संस्था यापूर्वी सुविधा केंद्र म्हणून कार्यरत नव्हत्या मात्र शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सुविधा केंद्र म्हणून काम करायचे आहे अशा संस्थांचे आपल्या कार्यालयाकडे प्राप्त झालेले अर्ज त्या संस्थांना सुविधा केंद्र म्हणून मान्यता देण्याबाबत या संचालनालयास आपले अभिप्राय सादर करावेत. तसेच या संचालनालयात प्राप्त झालेल्या अर्जाची यादी सोबत जोडत आहे.

अर्ज सुविधा केंद्र म्हणून अर्ज करणा-या संस्थांमध्ये खालील सुविधा असणे आवश्यक आहे.

**The Minimum infrastructure required at FC is as follows,**

1. 10 Nos. i5/i7 PC or of higher configuration each for Confirmation and facilitation respectively and additional 15 PCs to be made available for candidates use.
2. Windows 8 or higher Operating System with up to date security & service patches
3. Microsoft Office 2003 or higher version on all machine, Adobe Acrobat Reader 10.0 or above.

4. All the 25 machines (PC) and printer should be connected through LAN with minimum 2 Mbps internet connectivity through ADSL/Wimax /Leased line or other devices.
5. Internet Explorer 8.0/ Mozilla Firefox 3.0, Google Chrome 2.0 or above.
6. 2 LaserJet Network Printers.
7. Minimum 4 Scanner(3 for A4 and 1 for A3 ) with 300 dpi resolution.
8. Adequate Electrical Power Backup facilities.(10 kva ,2 Hours backup)
9. Counseling Hall with PA system, LCD Projector & seating arrangement for minimum 60 candidates.
10. Waiting Room for Candidates/Parents.
11. Potable Water drinking facility.
12. Separate clean Washrooms for Gents/Ladies

वर नमूद Infrastructure असलेल्या संस्थांमधील पूर्वीच्या सुविधा केंद्राच्या संस्था (सोबत यादी जोडत आहे) आणि नव्याने अर्ज केलेल्या संस्थांपैकी आवश्यक Infrastructure असलेल्या आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या सोयीचा विचार करून आपल्या कार्यालयांनी सदर संस्थेला सुविधा केंद्र म्हणून मान्यता देण्याबाबत अभिप्राय सादर करावेत. अभ्यासक्रमनिहाय सुविधा केंद्रांच्या शिफारशी आपल्या कार्यालयांकडून प्राप्त झाल्यानंतर मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मान्यतेने संचालनालयाकडून सुविधा केंद्र म्हणून संस्थांना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

येथे नमूद करण्यात येते की, एखादया अभ्यासक्रमाची संस्था एखादया भौगोलिक क्षेत्रात उपलब्ध नसेल तर अन्य अभ्यासक्रमाच्या संस्थेने सुविधा केंद्रासाठी अर्ज केला तर त्याचा विचार गुणवत्तेच्या आधारे करून तशी शिफारस करण्यात यावी. सुविधा केंद्र म्हणून शिफारस करताना अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे खालील नमुन्यात Excel Format मध्ये संचालनालयास माहिती कळविण्यात यावी.

| **List of Facilitation Centres(FC) For 2018-19** | | | शै वर्ष २०१८-१९ मध्ये सुविधा केंद्र बाबत माहिती (अभ्यासक्रम--- उदा. Post SSC, Post HSC and DSD etc) आवश्यक तेथे अशी ( ✓ ) खुण करावी | | | सुविधा केंद्र म्हणून शिफारस आहे / नाही (शिफारस नसल्यास कारणाचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वीची FC | नवीन FC | वगळलेले FC | |
| Sr.No. | Institute Code | Institute Name | | | | |
| | | | | | | |

उपरोक्त प्रमाणे आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीच्या प्रवेश प्रक्रीयेकरीता सुविधा केंद्र म्हणून कार्य करण्यासाठी या संचालनालयात/आपल्या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जांची पडताळणी करून आपल्या स्पष्ट शिफारसीसह संचालनालयास दिनांक ३१.०५.२०१८ पर्यंत सादर करण्यात याव्यात. तसेच या यादया सॉफ्ट कॉपीमध्ये desk10@dtemaharashtra.gov.in या ई मेल वर पाठविण्यात याव्यात.

( डॉ.अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

C:\Users\desk10\Desktop\F C letter to RO.docx